जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in




## -:प्रेस नोट :-

दिनांक :- १२/०५/२०२६

# " जळगाव जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांची विशेष मोहीम : लाखोंचा मुद्देमाल जप्त "

===ooo===

**मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे,** मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राबविण्यात आलेल्या **'विशेष मोहिमेत'** जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी व अंमलदारांनी सक्रिय सहभाग नोंदवून हातभट्टी, सट्टा/जुगार तसेच प्रोहिबिशन (दारूबंदी कायदा उल्लंघन) प्रकरणांवर धाडी टाकून मोठ्या प्रमाणावर कारवाई केली आहे.

सदर मोहिमेदरम्यान विविध ठिकाणी छापे टाकून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात येवुन संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, सदर मोहिमेत जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन स्तरावर एकाचवेळी समन्वयाने ही मोहीम राबविण्यात आली. मोहिमेत दाखल करण्यात आलेल्या गुन्हयांची माहिती खालील प्रमाणे

| हातभट्टी | | | सट्टा/जुगार | | | प्रोहिबिशन (/बाळगणे/पिणे/वाहतुक) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण केसेस | एकुण किती किंमतीचा हातभट्टी दारुचा मुद्देमाल नाश केला | एकुण आरोपी | एकुण केसेस | एकुण किती किंमतीचा मुद्देमाल जप्त | एकुण आरोपी | एकुण केसेस | एकुण किती किंमतीचा मुद्देमाल जप्त | एकुण आरोपी |
| ८५ | २४,६७,४८५/- | ८३ | ५८ | २,०२,१९२/- | ६९ | ३८ | १,४१,०६०/- | ३९ |

**सदरची मोहिम कारवाईत मा. पोलीस अधिक्षक, श्री श्रीकांत धिवरे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक,जळगाव तसेच श्रीमती कविता नेरकर, अपर पोलीस अधीक्षक चाळीगांव, सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी जळगांव जिल्हा तसेच पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांचे अधिपत्याखाली स्थापन करण्यात आलेल्या विशेष पथकातील अधिकारी/अंमलदार यांनी उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.**

**जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असुन जिल्हयात कुठेही असे अवैध धंदे चालु असल्यास नागरिकांनी निर्भयपणे पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगांव यांचे कडुन नागरिकांना करण्यात आलेले आहे.**

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**प्रति,**
**सर्व संपादक/वार्ताहार**
**प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक मिडीया**
**2/- जनहितार्थ प्रसारण करीता**

*****************************************************************************************************